G61/BPS902/EE/20160601

वेळ : 3 तास **गुण : 80**

विद्यार्थ्यांसाठी सूचना :

1. विभाग A वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्नांचा आहे. त्याची उत्तरे उत्तरपत्रिका / OMR Sheet वर नोंदवायची आहेत.

2. OMR Sheet वरील चार पर्यायांपैकी अचूक पर्यायाखालील वर्तुळ काळ्या पेनाने पूर्ण भरावे. वर्तुळ अर्धवट भरल्यास अथवा एका प्रश्नास जास्त वर्तुळ भरल्यास ते उत्तर चुकीचे समजले जाईल.



A B C D

उत्तराची अयोग्य नोंद



A B C D

उत्तराची योग्य नोंद

3. बहुपर्यायी प्रश्नांमध्ये सर्वात अचूक उत्तरे नोंदविणे अपेक्षित आहे.

4. विभाग B वस्तुनिष्ठ विनापर्यायी स्वरूपाचा आहे. त्यासाठी स्वतंत्र उत्तरपत्रिका दिली आहे.

5. विभाग C हा दीर्घोत्तरी स्वरूपाचा असून आवश्यक तेथे नकाशा व आकृत्या काढणे अपेक्षित आहे.

6. विभाग A साठी प्रत्येक चुकीच्या उत्तरासाठी 1/3 उणे गुणपद्धत लागू आहे.

7. विभाग B आणि C विभाग साठी उणे गुण पद्धत लागू नाही.

SECTION - A (गुण : 24)

या विभागात एकूण 48 प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नाला अर्धा गुण याप्रमाणे हा विभाग 24 गुणांचा आहे. या विभागाला 1/3 उणे गुण पद्धत लागू आहे.

1. खालीलपैकी कोणते शेड्यूल (Schedule) नगरपालिकेशी निगडित आहे?
   a) 9 b) 10
   c) 11 d) 12

2. खालीलपैकी काय हे आपण आयर्लण्ड या देशाचे संविधानातून घेतले आहे?
   a) मूलभूत कर्तव्ये b) मूलभूत हक्क
   c) सरनामा d) मार्गदर्शक तत्त्वे

3. प्रमाणशील प्रतिनिधित्व पद्धत भारतामध्ये कोणाला निवडण्यासाठी वापरली जाते?
   a) राज्यपाल b) राष्ट्रपती
   c) पंतप्रधान d) लोकसभेतील खासदार

4. 'वैज्ञानिक दृष्टीकोन, मानवतावाद, ज्ञानार्जन तसेच सुधारण्याची भावना यांचा विकास करा!' हे संविधानामध्ये कोणत्या भागात दिले आहे?
   a) मूलभूत कर्तव्ये b) सरनामा
   c) मूलभूत हक्क d) मार्गदर्शक तत्त्वे

5. कोणत्या घटनादुरूस्तीद्वारे समाजवादी, धर्मनिरपेक्ष अखंडता हे शब्द सरनाम्यात समाविष्ट केले गेले आहेत?
   a) 24 व्या b) 52 व्या
   c) 42 व्या d) 46 व्या

6. खालीलपैकी उपराष्ट्रपतीच्या निवडणूकीतील पात्रतेबाबत कोणते वाक्य अयोग्य आहे?
   a) तो भारताचा नागरिक असला पाहिजे.
   b) राज्यसभेच्या सदस्यासाठी लागणारी पात्रता अंगी असायला पाहिजे.
   c) तो संसदेच्या किंवा राज्य विधिमंडळाच्या कोणत्याही सभागृहाचा सदस्य असणे गरजेचे.
   d) त्याने शासकीय नियंत्रणाखालील लाभपद धारण केलेले असता कामा नये.

7. खालीलपैकी कोणते वाक्य राज्यसभेबाबत योग्य आहेत?
   i) राज्यसभेची सदस्यसंख्या 250 असते.
   ii) 250 पैकी 12 सदस्य राष्ट्रपतींद्वारा नियुक्त केले जातात.
   iii) राज्यसभा हे अस्थायी सभागृह आहे.
   iv) राज्यसभा सदस्यत्वाचा कार्यकाल 6 वर्षांचा असतो.
   a) i, ii योग्य
   b) i, ii, iv योग्य
   c) i, ii, iii योग्य
   d) i, ii, iii, iv योग्य

8. खालीलपैकी विधानसभा सदस्यत्वासाठी लागणाऱ्या पात्रतेबाबत कोणते वाक्य अयोग्य आहे?
   a) त्याची वयाची 30 वर्षे पूर्ण झालेली असावीत
   b) त्याचे नाव राज्याच्या कोणत्या तरी मतदार यादीत नमूद केलेले असावे.
   c) तो सरकारी नोकरीत नसावा.
   d) राखीव जागेसाठी त्या त्या जातीचाच उमेदवार असावा.

9. राज्यातील सर्व विद्यापिठांचे कुलपती कोण असतात?
   a) मुख्यमंत्री b) राज्याचा महाधिवक्ता
   c) राज्य निवडणूक आयुक्त d) राज्यपाल

10. भारतभर 'समुदाय विकास कार्यक्रम' प्रथम कोणत्या साली राबविण्यात आला?
    a) 1848 b) 1950
    c) 1952 d) 1955

11. पंचायतराज व्यवस्थेची स्थापना प्रथम कोणत्या राज्यात झाली?
    a) राजस्थान b) महाराष्ट्र
    c) आंध्रप्रदेश d) गुजरात

12. जोड्या लावा.

समिती	वर्षे
1) बलवंतराय मेहता	i) 1986
2) अशोक मेहता	ii) 1985
3) जी. व्ही. के. राव	iii) 1977
4) एल्. एम्. सिंघवी	iv) 1957

	1	2	3	4
a)	ii	i	iv	iii
b)	iii	iv	i	ii
c)	iv	iii	ii	i
d)	iii	i	ii	iv

13. एल्. एम्. सिंघवी समितीने दिलेल्या शिफारसींपैकी अयोग्य शिफारस ओळखा.

a) पंचायत संस्थांना घटनात्मक दर्जा देण्यात यावा.

b) पंचायत संस्था स्वावलंबी बनवाव्यात, पण त्यांना आर्थिक साधने उपलब्ध करून देणे गरजेचे नाही.

c) खेड्यांसाठी न्यायपंचायतीची स्थापना करणे.

d) पंचायतराज संस्थांच्या निवडणुका नियमित व्हाव्यात म्हणून राज्यघटनेत तशी तरतूद करावी.

14. i) राज्यघटनेच्या कलम 148 नुसार केंद्रीय पातळीवर एक महालेखापाल असेल, अशी तरतूद आहे.

ii) महालेखापालाची नेमणूक राष्ट्रपतीमार्फत होते.

a) फक्त i बरोबर b) फक्त ii बरोबर

c) i व ii बरोबर d) i व ii चूक

15. खालीलपैकी कोणते आयोग हे संवैधानिक आहेत?

i) राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग

ii) राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोग

iii) राष्ट्रीय मागासवर्गीय आयोग

iv) राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग

a) i, ii व iii b) i व ii

c) ii व iii d) i, ii, iii व iv

16. राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाबाबत योग्य वाक्य ओळखा.

a) मानवी हक्क उल्लंघनाच्या तक्रारीची सखोल चौकशी करणे.

b) तुरूंगांना भेट देऊन तेथील परिस्थिती कशी आहे, हे पाहाणे व सुधारणा करण्याची शिफारस करणे.

c) समाजातील विविध समूहांमध्ये मानवी हक्क विषयक जाणीव जागृतीचा प्रसार करणे

d) वरील सर्व योग्य

17. केंद्रीय लोकसेवा आयोगाबाबत अयोग्य वाक्य ओळखा.

a) हा वैधानिक (Statutory) आयोग आहे.

b) हा नागरी सेवा व सेवापदाच्या भरतीच्या प्रक्रिया ठरवितो.

c) आयोग आपल्या कार्याविषयी राष्ट्रपतींना अहवाल सादर करतो.

d) आयोगावर शासन यंत्रणेचा दबाव पडू नये, म्हणून स्वायत्तता बहाल करण्यात आली आहे.

18. भूदान चळवळीचे नेतृत्व कोणी केले होते?

a) लोकमान्य टिळक b) विनोबा भावे

c) बाबासाहेब आंबेडकर d) सरदार पटेल

19. भारताने मोठ्या उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयीकरणाची संकल्पना कोणत्या देशाच्या धर्तीवर घेतली गेली?

a) अमेरिका b) जपान

c) रशिया d) फ्रान्स

20. भूदान म्हणजे काय?

a) शासनाने सर्व जनतेकडून त्यांच्या जमिनी ताब्यात घेणे.

b) मोठ्या जमीनमालकांना त्यांच्या जमिनीपैकी काही भाग भूमिहीन व गरीब शेतकऱ्यांना देण्यासाठी प्रवृत्त करणे.

c) हिंसेचा वापर करून जमीन मालकांकडून जमिनी हिसकावणे.

d) भूदान म्हणजे सर्व जणांनी मिळून शेती करणे.

21. पहिल्या हरितक्रांतीमध्ये कोणत्या घटकाचा समावेश होत नाही?

a) उच्च वर्धिष्णू जातीचे बियाणे

b) रासायनिक खते व कीटकनाशके

c) आधुनिक सिंचनाच्या सोयी

d) सेंद्रीय खते

22. i) नियोजन मंडळाची स्थापना 1950 साली झाली.

ii) त्या नियोजन मंडळाचे अध्यक्ष पंडित नेहरू होते.

a) iबरोबर b) ii बरोबर

c) i व ii बरोबर d) i व ii चूक

23. i) देशातील विरोधी चळवळींद्वारे 1975 मध्ये आणीबाणी पुकारण्यात आली.

ii) आणीबाणी संपल्यानंतर झालेल्या लोकसभेच्या निवडणुकींमध्ये पुन्हा काँग्रेस पक्षाचे सरकार झाले.

iii) विरोधी चळवळीचे नेतृत्व जयप्रकाश नारायण यांनी केले होते.

a) फक्त i बरोबर b) i, ii व iii बरोबर

c) i व iii बरोबर d) सर्व अयोग्य

24. भारतीय कम्युनिस्ट पक्षाबाबत अयोग्य वाक्य ओळखा.

a) भारताच्या स्वातंत्र्यलढ्याला त्यांचे पूर्ण समर्थन होते.

b) स्वातंत्र्यानंतर भारतीय कम्युनिस्ट पक्षांचा दृष्टीकोन प्रामुख्याने नेहरू व काँग्रेसविरोधी होता.

c) रशियातील बोल्शेव्हिक क्रांतीप्रमाणे भारतात कामगार व शेतकरी यांची क्रांती घडून येईल, असा विश्वास होता.

d) पक्ष बी. टी. रणदिवे व सी. राजेश्वर यांच्या नेतृत्वाखाली कार्य करत होता.

25. i) 1920 साली लाला लजपतराय यांच्या अध्यक्षतेखाली 'आयटक' (ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस) ची स्थापना झाली.

ii) 1944 मध्ये काँग्रेसने स्वतंत्र संघटना 'इटक' (इंडियन नॅशनल ट्रेड युनियन काँग्रेस) ची स्थापना केली.

a) फक्त i बरोबर b) फक्त ii बरोबर

c) i व ii बरोबर d) i व ii चूक

26. जागतिकीकरणाबद्दल अयोग्य वाक्य ओळखा.

a) मुक्त व्यापाराचा पुरस्कार

b) आंतरराष्ट्रीय पातळीवर क्रिया–प्रतिक्रिया वाढविणारी प्रक्रिया

c) बिगर शासकीय संघटनाची सक्रियता

d) खासगीकरणाला वाव नाही

27. खालीलपैकी कोणता देश 'सार्क' (SAARC) चा सदस्य नाही?

a) नेपाळ b) पाकिस्तान

c) म्यानमार d) भूतान

28. खालील वाक्य कोणाचे आहे?

''समान व्यक्तींना असमान वागणूक दिल्यास न्यायाच्या तत्त्वांचा भंग होतो, तसेच असमान व्यक्तींना समान वागणूक दिल्यानेही होतो.''

a) प्लेटो b) ॲरिस्टॉटल

c) सेंट थॉमस d) जॉन रॉल्स

29. खालीलपैकी योग्य वाक्य ओळखा.

a) सामाजिक लोकशाही = स्वातंत्र्य, समता, बंधुत्व यांवर आधारलेल्या समाजाची निर्मिती

b) आर्थिक लोकशाही = आर्थिक विषमता नष्ट करून सर्वांना आर्थिक विकासाची संधी प्राप्त करून देणे.

c) राजकीय लोकशाही = सामाजिक व आर्थिक लोकशाही स्थापन झाल्याखेरीज राजकीय लोकशाही यशस्वी नाही

d) वरील सर्व बरोबर

30. उदारमतवादाचा जनक कोणाला मानले जाते?

a) जॉन लॉक b) कार्ल मार्क्स

c) हेगेल d) जेरमी बेंटाम

31. फॅसिस्टवादाबद्दल अयोग्य वाक्य ओळखा.

a) बेनिटो, मुसोलिनी या धोरणास चालना दिली.

b) 'फॅसिओ' या शब्दाचा अर्थ 'काठ्यांचा जुडगा' असा होतो.

c) ही विचारसरणी वंशवाद, अधिकारशाही व सर्वंकष प्रस्थापित करण्यासाठी मांडण्यात आला.

d) ही विचारसरणी लोकशाहीचा पुरस्कार करते.

32. जोड्या लावा.

विचारवंत	**पुस्तक (ग्रंथ)**
1) प्लेटो	i) 'दि पॉलिटिक्स'
2) ॲरिस्टॉटल	ii) 'दि प्रिन्स'
3) मॅक्यिव्हेली	iii) 'दि रिपब्लिक'

a) 1 2 3 — i ii iii

b) 1 2 3 — ii i iii

c) iii i ii

d) iii ii i

33. 'लेव्हिएथन' हा ग्रंथ कोणी लिहिला?

a) हॉब्ज b) मार्क्स

c) मॅकियाव्हली d) सबाईन

34. लॉकने सांगितलेले शासनसंस्थेचे घटक कोणते?

a) विधिमंडळ b) कार्यकारी मंडळ

c) न्यायमंडळ d) वरील सर्व

35. खालीलपैकी कोणाला आधुनिक राज्यशास्त्राचा जनक म्हणतात?

a) मिल b) रूसो

c) मॅकियाव्हली d) हॉब्ज

36. मूलभूत कर्तव्यांबाबत खालील अयोग्य वाक्य ओळखा.

a) ती रशियाच्या मूलभूत कर्तव्यावरून घेतलेली आहेत.

b) स्वर्णसिंग कमिटी याच्याशी निगडित आहे.

c) एकूण अकरा मूलभूत कर्तव्ये आहेत.

d) मूलभूत कर्तव्ये भारतीय तसेच विदेशी नागरिकांना बंधनकारक आहेत.

37. मार्गदर्शक तत्त्वांमधील योग्य वाक्य ओळखा.

a) मार्गदर्शक तत्त्वे सकारात्मक आहेत.

b) शासनावर नैतिक व राजकीयदृष्ट्या बंधनकारक आहेत.

c) ती समुहाच्या कल्याणाला चालना देतात.

d) वरील सर्व बरोबर

38. योग्य वाक्य शोधा.

i) वित्त आयोगाची दर पाच वर्षांनी स्थापना होते.

ii) राष्ट्रपती वित्त आयोगाची नेमणूक करतो.

a) फक्त i बरोबर

b) फक्त ii बरोबर

c) i व ii बरोबर

d) दोन्ही चूक

39. सार्वजनिक लेखा समितीचा मार्गदर्शक व मित्र कोणाला म्हटले जाते?

a) कॅग (CAG)

b) महाधिवक्ता

c) सॉलिसिटर जनरल

d) यापैकी नाही

40. 'भारताच्या आर्थिक विकास योजना' (1945) याला दुसऱ्या कोणत्या नावाने ओळखले जाते?

a) नागपूर योजना

b) दिल्ली योजना

c) कलकत्ता योजना

d) मुंबई योजना

41. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेला कोणते प्रमाण होते?

a) महालनोबिस प्रमाण

b) अमर्त्य सेन प्रमाण

c) बोरियल प्रमाण

d) आंबेडकर प्रमाण

42. 'आसियान' (ASEAN) या व्यापारसंघाची सदस्यसंख्या दहा आहे. अयोग्य सदस्य ओळखा.

a) मलेशिया b) सिंगापूर

c) थायलँड d) भारत

43. 'नाटो' या संघटनेबद्दल अयोग्य विधान ओळखा.

a) ही एक लष्करी संघटना आहे.

b) अमेरिकेने ही संघटना प्रस्थापित करण्यासाठी पुढाकार घेतला.

c) मूळ उद्देश साम्यवादाच्या प्रसाराला आळा घालून भांडवलशाही, लोकशाहीचे संरक्षण करणे.

d) रशिया नाटोचा सदस्य देश आहे.

44. भारताच्या आण्विक धोरणाबद्दल योग्य विधान ओळखा.

a) मुख्य उद्देश अणुशक्तीचा विकासात्मक कार्यासाठी उपयोग करणे हा आहे.

b) भारताने पहिली आण्विक चाचणी 1974 साली पोखरण येथे केली.

c) भारत अण्ववस्त्रांचा उपयोग प्रथम करणार नाही, असे भारताचे धोरण आहे. तर हल्ला झालाच तर प्रत्युत्त्युर म्हणून त्याचा वापर करणार.

d) वरील सर्व योग्य

45. विश्व व्यापार संघटना 1995 साली कोणत्या कराराची जागा घेऊन अस्तित्वात आली?

a) वॉर्सा करार

b) गॅट करार

c) मास्ट्रीच करार

d) पॅरिस करार

46. अलिप्ततावाद चळवळीत मुख्यत: कोणत्या खंडातील देशांचा समावेश होतो?

a) आशिया, आफ्रिका

b) युरोप, ऑस्ट्रेलिया

c) उत्तर अमेरिका, ऑस्ट्रेलिया

d) उत्तर अमेरिका, लॅटिन अमेरिका

47. 'नीती आयोगाची' स्थापना कोणत्या आयोगाला बदलून केली गेली आहे?

a) वित्तीय आयोग

b) निवडणूक आयोग

c) नियोजन आयोग

d) कर आयोग

48. राज्य निवडणूक आयुक्त, राज्य लोकसेवा अध्यक्ष यांची नेमणूक खालीलपैकी कोण करते?

a) मुख्यमंत्री

b) राष्ट्रपती

c) उच्च न्यायालयाचा मुख्य न्यायाधीश

d) राज्यपाल

SECTION - B (गुण : 24)

या विभागात एकूण 24 प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नाला एक गुण याप्रमाणे हा विभाग 24 गुणांचा आहे. या विभागाला उणे गुण पद्धत लागू नाही.

1. राज्यघटना निर्मिती वेळी मसुदा समितीचे अध्यक्ष कोण होते?
2. भारताने मूलभूत हक्क कोणत्या देशाच्या राज्यघटनेतून घेतले आहेत?
3. संपत्तीचा हक्क हा मूलभूत हक्क आहे का?
4. नवीन राज्याची निर्मिती/स्थापना ही कोणत्या बहुमताने होणारे घटनादुरूस्ती आहे?
5. भारतीय राज्याचा प्रमुख व प्रथम नागरिक असे कोणाला म्हटले जाते?
6. केंद्रामध्ये मंत्रिमंडळाचा प्रमुख नेतृत्व कोणाकडे असते?
7. भारताच्या राष्ट्रपतींना कोणते तीन नकाराधिकार आहेत?
8. राज्यपाल आणि मंत्रिमंडळ यांच्यातील दुवा म्हणून कोण कार्य करते?
9. भारतीय संसदेचे कनिष्ठ सभागृह आणि वरिष्ठ सभागृह असे कोणाला म्हटले जाते?
10. अशोक मेहता समिती (1977) ही कोणत्या विषयाशी निगडीत होती?
11. भारतातील वित्तीय व्यवस्थेचा प्रमुख तसेच सार्वजनिक निधीचा रक्षणकर्ता असे कोणास म्हटले जाते?
12. मिश्र अर्थव्यवस्था म्हणजे काय?
13. विश्वस्ताची कल्पना (Trusteeship) कोणी मांडली?
14. भारताने 1956 साली कोणत्या देशाकडून धान्य आयात केली होती?
15. जागतिकीकरण म्हणजे काय?
16. 'सार्क' या व्यापारसंघ स्थापनेची कल्पना कोणी मांडली होती?
17. 'अलिप्तवाद चळवळ' स्थापनेमागे प्रमुख उद्देश काय होता?
18. राज्यघटनेच्या कलम 123 नुसार वटहूकूम काढण्याचा अधिकार कोणाला आहे?
19. युरोपियन महासंघाची निर्मिती कोणत्या करारातून झाली आहे?
20. लोकशाहीचे प्रमुख दोन प्रकार कोणते?
21. मार्क्सवादात समाजात कोणते दोन वर्ग अस्तित्वात आहे, असे सांगितले होते?
22. प्लेटोच्या विचारांवर कोणाचा प्रभाव पडला होता?
23. ॲरिस्टॉटलने संपत्तीचे कोणते दोन प्रकार सांगितले आहेत?
24. समाजवाद म्हणजे काय?

SECTION - C (गुण : 32)

हा विभाग दीर्घोत्तरी स्वरूपाचा आहे. या विभागाला 32 गुण आहेत. या विभागाला उणे गुण पद्धत लागू नाही.

कोणतेही चार सोडवा.

1. समता म्हणजे काय? समतेचे प्रकार विशद करा.

2. गांधीवादाची वैशिष्ट्ये लिहा.

3. लोकशाही पद्धतीची लक्षणे लिहा.

4. राष्ट्रपतींचे अधिकार व कार्ये लिहा.

5. आदर्शवादी सिद्धान्ताची वैशिष्ट्ये लिहा.

6. जागतिकीकरणाचे टीकात्मक परीक्षण करा.